# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यतील ओबीसी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत असल्याबाबत**

**(१) १४५५३ (१०-०४-२०१५). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने २०१३ पासुन केंद्र शासनाची १०० टक्के शिष्यवृत्तीची योजना लागु केली, मात्र २००७ पासुन व्यावासायीक अभ्यासक्रमात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क व शैक्षणिक शुल्क ५० टक्के राहील असा वेगळा निर्णय घेण्यात आला असे दि. १५/०१/२०१५ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे ओबीसी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होत असल्याने हे शासन यात बदल करुन ओबीसीना उपरोक्त निर्णयाप्रमाणे १०० टक्के शिष्यवृत्ती योजना लागू करणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१५) :** (१) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतंर्गत राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना १००% निर्वाहभत्ता व ५०% शिक्षण शुल्क/परिक्षा शुल्क देण्यात येते.

(२) व (३) इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही १००% केंद्र पुरस्कृत योजना असली तरी सदर योजनेकरीता राज्याच्या मागणीप्रमाणे केंद्राकडून निधी प्राप्त होत नाही. त्यामुळे या योजनेवरील खर्च राज्याच्या उपलब्ध निधीतून भागविण्यात येतो. ही बाब विचारात घेता इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे १००% शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क देणे शक्य होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वीर बाजीप्रभु देशपांडे यांच्या स्मारक समितीच्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाबाबत**

**(२) १४५८७ (०८-०४-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीर रत्न बाजी प्रभू देशपांडे यांचे जन्मगाव परडे नम-२, गाव - शिंद, तालुका भोर, जिल्हा पुणे येथे वीर रत्न बालीप्रभू देशपांडे स्मारक प्रतिष्ठानच्या मालकीची जमिनीवर जिल्हा परिषदेच्या निधीतून सामूहिक शौचालये बांधण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन शौचालये पाडून तेथे वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे राष्ट्रीय स्मारक बांधणे शक्य आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

वीर रत्न बाजी प्रभू देशपांडे यांचे जन्मगाव परडे --नं-२ गाव-शिंद, तालुका भोर, जिल्हा पुणे येथील ८९ आर जागेवर सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत (शौचालयासह), प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, पशु वैद्यकीय दवाखाना इत्यादी इमारती अस्तित्वात आहे, सदर ८९ आर जागेपैकी २२ आर इतकी जागा वीर रत्न बाजीप्रभू देशपांडे यांच्या स्मारकासाठी देण्यात आली असून या जागेवर जिल्हा परिषदेच्या निधीतून सामूहिक शौचालये बांधण्यात आली नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या मुंबई स्थित मुख्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी टिपलेल्या दृश्यांवर सातत्याने नजर ठेवणारी यंत्रणा अस्तित्वात नसल्याबाबत**

**(३) १४६५५ (०७-०४-२०१५). श्री. भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई स्थित मुख्यालय बसविण्यात आलेल्या तब्बल ८७ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी टिपलेल्या दृश्यांवर कंट्रोल रुममधून सातत्याने नजर ठेवणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आणि म्हाडा मुख्यालयात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही दृश्यांवर नजर ठेवणारी यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२६-०५-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

यापूर्वी गृहनिर्माण भवनात अस्तित्वात असलेले सीसीटीव्ही कॅमेरे अपुर असल्याकारणाने म्हाडा गृहनिर्माण भवनामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच नागरिकांचा संपर्क होणाऱ्या भागांमध्ये व अनधिकृत व्यक्ती/दलाल यांच्यावर नजर ठेवणेकरिता अंदाजे ८७ सीसीटीव्ही कॅमेरे माहे डिसेंबर, २०१५ पर्यत बसविण्यात येऊन सदर यंत्रणा माहिती व संगणक तंत्रज्ञान कक्षामार्फत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आली.

(२) नाही.

(३) व (४) नव्याने स्थापन करण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह नियंत्रण कक्ष म्हाडाच्या माहिती संगणक तंत्रज्ञान कक्षामार्फत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आली असून नियंत्रण कक्षामध्ये सुरक्षा यंत्रणा सांभाळण्याकरिता सुरक्षा रक्षक कर्मचारी वर्गास प्राथमिक स्वरुपाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. येत्या कालावधीत नियंत्रण कक्ष पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

### मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) या गावच्या नळपाणी पुरवठ्याच्या प्रस्तावाबाबत

**(४) १४६६५ (०७-०४-२०१५). डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) या गावच्या नळ पाणी पुरवठ्याचा प्रस्ताव शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय व सदर योजनेच्या कामाचे अंदाजपत्रक किती आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयानुसार नळ पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देऊन सदर नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रस्तावास शासन निर्णय दिनांक २८.४.२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजनेची ढोबळ किंमत रु.१२८९.८३ लक्ष इतकी आहे. प्रारुप निविदा प्रपत्रे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील धरणांच्या भिंतीवर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्याबाबत**

**(५) १४६८२ (३०-०४-२०१५). डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धरणांच्या भिंतीवर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०४-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदरहू विनंतीच्या अनुषंगाने अहवाल/अभिप्राय शासनास सादर करण्याच्या सूचना महासंचालक, महाऊर्जा, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.

---

**अमरावती येथील तपोवनच्या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व विदर्भातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करण्याची केलेली मागणी**

**(६) १४६८४ (०९-०४-२०१५). डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील तपोवनच्या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व विदर्भातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरील विद्यापीठ सुरु करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) अत्यंत कमी आरोग्य विज्ञान विषयक अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करणे संयुक्तिक होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म.पुणे या संस्थेकडे देण्यात येणारे अनुदान नविन कायद्यानुसार बंद करण्यात आलेबाबत**

**(७) १४६८६ (१०-०४-२०१५). डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे या संस्थेकडे देण्यात येणारे अनुदान नविन कायद्यानुसार बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देणा-या या संस्थेत अनुदान देण्यासाठी आवश्यक तरतूद करण्यासाठी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री, सहकार विभाग यांचेकडे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :**(१) महाराश्ट्र राज्य सहकारी संघास १९९६-१९९७ पर्यंत शासनाकडून प्लॅन योजनेखालील शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमसाठी अनुदान प्राप्त झाले आहे. तदनंतर शासनाने अनुदान बंद केले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य सहकारी संघास अनुदान देण्याची तरतूद कायद्यात नव्हती.

(२) मागणी निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) महाराष्ट्र राज्य सहकारी संघास दि. १२ सप्टेंबर, २०१४ च्या आदेशान्वये अधिसूचित केले आहे. प्रशिक्षणासाठी शुल्काचे दर विहीत करण्याकरीता नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उजणी धरणाचे मासेमारी हक्क मत्स्यविभागाकडून जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्याबाबत**

**(८) १४७४० (०८-०४-२०१५). श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजणी धरणाचे मासेमारी हक्क मत्स्यविभागाकडून जलसंपदा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील २००८ पासून पाटबंधारे विभागाकडे हस्तांतरण झाल्यापासून येथे मत्स्य बिजेच सोडण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) तसेच, जलसंपदाच्या अंतर्गत कोणतीही सुरक्षा व्यवस्थेची उपाययोजना करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी जलसंपदा व पाटबंधारे विभागाकडून कुठली कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

धरण सुरक्षेसाठी गृह/जलसंपदा विभागामार्फत २४ तास गस्त घालून सुरक्षा पुरविली जाते. तसेच जलसंपदा विभागामार्फत सीसीटीव्ही कॅमेरे फ्लडालाईट बसविण्यात आलेले आहेत. तसेच धरण सुरक्षा पट्टयात तार कुंपण केलेले आहे. आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधाबाबत सुचना / इशारा फलक लावण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ (जि.पुणे) तालुक्यात मोठया प्रमाणात बेकायदा वृक्षतोड सुरु असल्याबाबत**

**(९) १४७४८ (०८-०४-२०१५). श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील वनविभागाचे नियंत्रण नसल्याने तालुक्यात मोठया प्रमाणात बेकायदा वृक्ष तोड सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८५ व्यक्तींना जिल्ह्यात वृक्ष तोड व्यापार करण्याची परवानगी असल्याने त्याच्या व्यतिरिक्त वृक्ष तोड करणा-या किती व्यक्तींवर कार्यवाही आजवर करण्यात आली, नसल्यास, विलंबाची सर्व साधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) पुणे जिल्हयात ८५ व्यक्तींना जिल्हयात वृक्षतोड तथा व्यापार करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. अवैध वृक्षतोड करणाऱ्या व्यक्तींवर वेळेत कायदेशीर कारवाई करण्यात येते.

---

**रसोया प्रोटीन्स लि. कुंड मलकापूर जि.बुलडाणा यांनी सोयाबीन खरेदीत शेतक-यांची फसवणूक केल्याबाबत**

**(१०) १४७६६ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील रसोया प्रोटीन्स लि. मलकापूर (कुंड) यांनी सोयाबीन खरेदी प्रकरणी फसवणूक केल्याबाबत श्री.संजय टेकाडे रा.रुईखेड टेकाळे ता.जि.बुलडाणा व इतर शेतक-यांनी गुन्हा दाखल करणेबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक बुलडाणा यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, अनुषंगाने शासनाने कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.

सदर प्रकरणी, पोलीस स्टेशन मलकापूर येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी श्री. संजय टेकाडे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे. संजय टेकाडे हे व्यापारी असून बाजारभावापेक्षा जास्त भाव मिळाला तर पैसे दोन ते तीन महिन्यांनी मिळाले तीर चालतील अशी त्यांनी कंपनीसोबत बोलणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. कंपनीच्या एम.डी.नी. सध्या औद्योगिक क्षेत्रात मंदी असल्यामुळे आर्थिक अडचणीमुळे काही क्षेत्रात असलेली रक्कम लवकरात लवकर देणार आहे. त्यामुळे कंपनीवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील डोंगरी तालुक्यांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत दरडोई खर्च वाढविण्याबाबत

**(११) १४७९० (०७-०४-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डोंगरी तालुक्यांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेचा दरडोई खर्च रुपये ३८००/- इतका निश्चित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी लोकसंख्येच्या डोंगरातील वाड्या, वस्त्या, धनगरवाडे यांच्या पासून पाण्याचा स्त्रोत लांब असल्याने योजनेच्या पाईपलाईनचा, विद्युत वाहिन्यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या निश्चित केलेल्या दरडोई खर्चाच्या प्रमाणात न बसल्यामुळे अनेक पाणी योजनांची प्रशासकीय मंजुरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डोंगरी तालुक्यांसाठी दरडोई खर्चाचे प्रमाण ३८००/- रुपयांवरुन ६०००/- रुपये करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :**(१) व (२) शासन निर्णय दि. १८ मे, १९९६ अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्याक्रमांतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी दरडोई खर्चाचे निकष निश्चित करण्यात आले होते. सन १९९६ ते २०१३ या कालावधीत पाणी पुरवठा योजनांच्या साहित्याच्या किंमतीत झालेली वाढ, लोकप्रतिनिधींकडून होत असलेली मागणी या बाबी विचारात घेवून दि. ९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | क्षेत्र | दरडोई खर्चाचे सुधारीत दर (रुपयात) | | |
|---|---|---|---|---|
| | | ४० LPCD | ५५ LPCD | ७० LPCD |
| | कोकण वगळता राज्याच्या इतर भागासाठी | | | |
| १ | निर्देशित डोंगरी भाग | २७५६ | ३१८० | ३४९८ |
| २ | ३० मीटरपेक्षा जास्त स्टॅटिक लिप्ट असलेल्या योजना | २३२७ | २६८५ | २९५३ |
| ३ | ३० मी. पर्यंत स्टॅटिक लिप्ट असलेल्या योजना | १८०७ | २०८५ | २२९३ |
| | कोकण क्षेत्रासाठी | | | |
| १ | निर्देशित डोंगरी भाग | ३०२९ | ३४९५ | ३८४४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ३० मीटरपेक्षा जास्त स्टॅटिक लिप्ट असलेल्या योजना | २५६१ | २९५५ | ३२५० |
| ३ | ३० मी. पर्यंत स्टॅटिक लिप्ट असलेल्या योजना | १९८९ | २२९५ | २५२४ |

या शासन निर्णयातील तरतुदींनुसार ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या उद्भवाचे अंतर मुख्य साठवण टाकीपासुन ३ कि.मी. पेक्षा जास्त होत असेल किंवा १०० मी.पेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागत असेल अशा योजनांमधील ३ कि.मी. पासून पुढे किंवा १०० मी.उंचीपेक्षा वरील पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपीग मशिनरी यांच्या वाढीव कामाचा खर्च दरडोई खर्च ठरवितांना विचारात घेण्यात येवू नये, असे निश्चित केले आहे.

(३) विहित दराडोई खर्चाच्या निकषाच्या ५० टक्केपर्यंत अधिक दरडोई खर्च असणा-या पाणी पुरवठा योजनांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावरून मान्यता देण्यात येते. तर विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या अधिक ५० टक्के ते १०० टक्केपर्यंतच्या दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून (शासन स्तरावरुन) मान्यता देण्यात येते. याशिवाय विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या १०० टक्केहून अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे सध्या निश्चित केलेल्या दरडोई  खर्चाच्या प्रमाणात न बसल्यामुळे अनेक पाणी योजनांची प्रशासकीय मंजुरी प्रलंबित आहे, हे खरे नाही.

(४) व (५) विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या अधिक दरडोई खर्च असणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना मान्यता देण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे विविध स्तरावर यंत्रणा कार्यरत असल्याने डोंगरी भागासाठी दरडोई खर्चाचे प्रमाण वाढविण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**महावितरण कंपनीच्या नियमानुसार ग्रामीण भागामध्ये लाईन मन नियुक्त करण्याबाबत**

**(१२) १४७९१ (०७-०४-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या नियमानुसार ग्रामीण भागामध्ये प्रति ४०० कनेक्शन मागे १ लाईन मन नियुक्त करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमामुळे डोंगरी तालुक्यातील छोट्या-मोठ्या वाड्या वस्त्यांमध्ये कनेक्शनची संख्या कमी असल्याने व भौगोलिक क्षेत्रफळ जादा असल्याने ग्राहकांना वेळेत सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोंगरीतालुक्यातील प्रति ४००० कनेक्शन मागे १ लाईनमन हा नियम रद्द करून भौगोलिक क्षेत्रफळाच्या प्रमाणात लाईन मनची संख्या निश्चित करण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे का वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) महावितरण कंपनीने ग्राहकभिमुख उत्तम व तत्पर सेवा देण्याकरीता डोंगरी तालुके व भौगोलिकक्षेत्रफळाच्या दूष्टीने कार्यालयाचा आढावा घेण्याचे ठरविले असून नविन कर्मचारी/ग्राहक मानंके ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**कासारवाडी ( ता.शाहूवाडी जि. कोल्हापूर) या गावामधील नळपाणी पुरवठा योजनेअंतर्गत नवीन पाण्याची टाकी बांधकामाला वन खात्याने मंजूरी देण्याबाबत**

**(१३) १४७९२ (०७-०४-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परळी पैकी कासारवाडी (ता.शाहूवाडी जि. कोल्हापूर) या गावामध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेमधुन नळपाणी पुरवठा योजना मंजुर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंदाजपत्रकामध्ये वनहद्दीमधील निकामी झालेली जुनी पाण्याची टाकी पाडून नवीन पाण्याची टाकी बांधण्याचे काम समाविष्ट असून सदर काम सुरु करत असताना वनविभागाच्या अधिका-यानी नवीन टाकी बांधकामास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाची वर्क ऑर्डर झाली आहे काय, जुन्या टाकीच्या बांधकामाला वन खात्याने अनेक वर्षापूर्वी मान्यता दिली होती हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नविन पाणी टाकीचे बांधकामाच्या परवानगीबाबत शासनाने वन विभागाला सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर गावांमधील जुनी टाकी साधारणतः ३० वर्षांपूर्वीची असल्याने त्याऐवजी नवीन टाकीचे बांधकाम करण्याचे मंजूर योजनेत प्रस्तावित आहे. तथापि, सदर जागा वन विभागाच्या हद्दीत असल्याने नवीन टाकीच्या बांधकामास वन विभागाने हरकत घेतली आहे.
(३) सदर कामाचे कार्यादेश (work order) ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांचे मार्फत दि.२८ जुलै, २०१४ रोजी दिले आहेत. जुन्या टाकीच्या बांधकामाबाबत वन विभागाने परवानगी दिल्याबाबतचा कोणताही दस्तावेज उपलब्ध नाही.
(४) सदर जागा ही वन विभागाच्या हद्दीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे टाकी बांधकाम करण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव ग्रामपंचायतीमार्फत वन विभागास दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी सादर करण्यात आला आहे.

---

**लोळाणे ते आलतुर (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथील कडवी नदीवर पुल बांधण्याबाबत**

**(१४) १४७९३ (१०-०४-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोळाणे ते आलतुर (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथील कडवी नदी पात्रावरील पुल बांधण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभागाने सर्वेक्षण पूर्ण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलामुळे लोकांच्या वाहतुकीचा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवस प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रस्तावाला तातडीने मान्यता देऊन आर्थिक तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्नाधीन पुलाचे काम निकष मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**पन्हाळागड (जि.कोल्हापूर) किल्ल्याच्या हद्दीतील घरदुरुस्ती व नवीन इमारत बांधकाम करण्याच्या परवान्याबाबत**

**(१५) १४७९७ (०७-०४-२०१५). श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जिल्हा कोल्हापूर) नगरपरिषदेत सन १९९२ पासून पन्हाळागड किल्ल्याच्या तटबंदी पासून ० ते ३०० मीटर हद्दीतील घरदुरुस्ती व नवीन इमारत बांधकाम करण्यासाठी केंद्रीय पुरातत्व विभागाची ना हरकत घेणे बंधनकारक आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० च्या कायद्यानुसार राष्ट्रीय स्मारक प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे असे प्रस्ताव पाठवावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राधिकरणामध्ये परवानगी मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व नागरिकांना बांधकामासाठी ना हरकत दाखले वेळेत मिळण्यासाठी केंद्रीय पुरातत्व विभागाकडे राज्य शासन प्रयत्न करणार आहे काय ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) पन्हाळा किल्ला हा राष्ट्रीय संक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येतो. सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य क्षेत्रिय निदेशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण पश्चिम क्षेत्र, सायन किल्ला, सायन, मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर परवानगी देण्याची कार्यवाही राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणामार्फत केली जाते. विहीत वेळेत दाखले मिळण्याकरीता आवश्यकता भासल्यास पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयामार्फत पाठपुरावा करण्यात येईल.

---

**चंद्रपूर जिल्हयातील तह.राजुरा येथील अंबुजा सिमेंट कंपनी उपरवाहीला पकडीगुड्डम मरकागोदी धरणाचे पाणी देण्याबाबत**

**(१६) १४८२५ (०८-०४-२०१५). ॲड. संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील तह.राजुरा येथील अंबुजा सिमेंट कंपनी उपरवाही ला पकडीगुड्डम मरकागोदी धरणाचे पाणी देण्याचे ठरले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी करारामुळे शेतक-याच्या हिताला आर्थिक व सामाजिक बाबींवर प्रकल्पग्रस्त शेतक-यांवर अन्याय होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पकडीगुड्डाम मरकागोदी तलावाखाली लाभार्थी क्षेत्र २८६०.०० सिंचनाखाली येत असल्याने सन २०१५ चे माहे जानेवारी महिन्यात पाणी न देण्यात आल्याने नुकसान झाल्याचे आढळून आले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कंपनी सोबत असलेला करार रद्द करण्यास वा कंपनी तर्फे शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(५) नसल्यास, त्यावरील सर्वसाधारण कारणे व उपाययोजना कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) अंबुजा सिमेंट कंपनीला ३.०३ दलघमी पाणी दिल्यामुळे ८०२ हेक्टर सिंचन क्षेत्र कमी झालेले आहे.

(३) नाही.

सन २०१४-१५ मध्ये अत्यल्प पाऊस झाल्यामुळे ६६१ हेक्टर क्षेत्रात खरीप सिंचन करण्यात आले. रब्बी हंगामा सिंचनाकरीता धरणात पुरेसे पाणी उपलबध नसल्यामुळे रब्बी सिंचन होऊ शकले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगांव (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील निम्न वेणा प्रकल्पाबाबत**

**(१७) १४८४१ (०८-०४-२०१५). श्री. समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांव (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील निम्न वेणा प्रकल्पाचे काम १९९४ साली झालेले असून सिंचन देखील चालू आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मोहगांव येथील १७ भुधारकांची खाजगी जमीन भुसंपदा विभागामार्फत संपादीत करण्यात आली असून त्यांना त्यांच्या जमीनीचा मोबदला दिला नसल्याने सदर मोबदला देण्याकरिता दिनांक ८ जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मंत्र्यांकडे मागणी केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भुधारकांचा मोबदला देण्यास शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, सदर भुधारकांना मोबदला कधी पर्यंत देण्यात आले आहे काय,

(५) नसल्यास, विलंबनाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :**(१) होय. मौजे-मोहगांव येथिल भूसंपादन प्रकरणी मा.श्री.समीर मेघे, आमदार हिंगणा विधानसभा, नागपूर यांनी याबाबत मा.मंत्री याचेकडे मागणी केली आहे.

(२) सदर प्रकरणी अंतिम निवाडा दिनांक १७.१.२०१५ रोजी घोषित झालेला असून त्यापोटी रु. ६.२९ कोटी निधी महसूल यंत्रणेकडे दिनांक २.३.२०१५ रोजी धनादेशाद्वारे जमा केलेला आहे.

(३) महसूल यंत्रणेमार्फत भूधारकांना मोबदला अदायगीबाबत पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील वन अधिकारी वन्य प्राण्यांवर कोणतेही उपाययोजना करत नसल्याने वन्य प्राण्यांनी घातलेलया हौदोसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत**

**(१८) १४८५३ (०८-०४-२०१५). श्री. समिर मेघे (हिंगणा), श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील वनअधिकारी वन्य प्राण्यांवर कोणतेही उपाययोजना करत नसल्याने वन्य प्राण्यानी घातलेल्या हौदोसामुळे शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून वन्य प्राण्यांवर उपाययोजना करण्याकरीता निर्देश देण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५)** :(१) नागपूर जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये वन्यप्राण्याची शेतपिकांचे नुकसान केलेली १०४१ प्रकरणे निदर्शनास आली असून शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतक-यांस नुकसानभरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) वन्यप्राण्यांकडून शेत पिकांचे नुकसानीवर आळा घालण्यासाठी नागपूर वन विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- प्रयोगिक तत्वावर वनक्षेत्राभोवती २ खोल चर खोदण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.
- वन्या प्राणी खाणार नाहीत अशी पीके घेण्यासंदर्भात शेतकऱ्यांत जनजागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना जंगलात पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जंगलात कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले असुन पाणवठ्यावर मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.
- पाळीव जनावरांना जंगलात न पाठविता स्टॉल फिडींग करण्याबाबत जलजागीती करण्यात येत आहे जेणेकरुन वन्याप्राण्यांना जंगलातच खद्य उपलब्ध होईल व ते मुनष्य वस्तीकडे व त्यांचे शेताकडे येणार नाहीत.
- शेतपिकाचे वन्यप्राण्यांकडून होणा-या नुकसानी संदर्भात डॉ.रुद्र एन.जी. ओ. यांना बोलावून शेतपिकाचे नुकसानीवर आळा घालण्यासाठी गावक-यांकरीता प्रात्याक्षिक घेण्यात आले.
- नागपूर वन विभागातील संरक्षित क्षेत्रात बोरवेल-८४५ नग, खोदतळे-५३६ नग, वनतळे-६४ नग व भूमिगत बंधारे- ५७८ नग बांधण्यात आलेले आहे.
- संरक्षित क्षेत्रात कुरण विकासासारखी अधिवास विकासाची कामे घेऊन वन्यप्राण्यांना वनातच खद्य उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करण्यात येतात.
- शासन निर्णयाप्रमाणे नुकसानग्रस्त शेतक-यास नुकसान भरपाई वेळीच अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहरात व परिसरात कृषिपंपाच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(१९) १४८६३ (०७-०४-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) शहरात व परिसरात कृषिपंपाच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे शेतक-यांनी २०१४ रोजी स्थानिक बसस्थानकांसमोर ‘रास्ता रोको’ आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चोरीप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

शेतक-यांनी रास्ता रोको आंदोलन केले ही गोष्ट खरी आहे. परंतू कृषी पंपांच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली नाही.

(२) दिनांक १० जुलै, २०१४ रोजी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन सिंदखेडराजा येथे गु.र.क.४६/१४, भा.दं.वि कलम ३७९ व दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजी गु.र.क. ७६/१४, भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी तपास केला असता, आरोपी व चोरींचा माल मिळून न आल्यामुळे गुन्हा प्रलंबित न राहण्यासाठी तुर्तास अ फायनल मंजूरीसाठी सादर करण्यात आले होते, विशेष न्यायालयाने दोन्ही अ फायनल मंजूर केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील शांतीनगर भागातील शिधावाटप दुकानातील अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत असलेल्या धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२०) १४८७४ (०७-०४-२०१५). श्री. दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील शांतीनगर भागातील शिधावाटप दुकानात अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत आलेल्या धान्याचा काळाबाजार होत असल्याचा माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-०५-२०१५) :**

(१) अशा आशयाची श्री.खान मतलुब अफजल, नगरसेवक यांनी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, यांच्याकडे, दि. २ मार्च, २०१५ रोजी पिरानी पाडा शांतीनगर, रोड भिवंडी येथील अधिकृत शिधावाटप दुकान क्र.३७ फ १३१, ३७ फ १८१ यांच्याविरुध्द तक्रार केली आहे.

(२) व (३) फ परिमंडळ ठाणे येथील शिधावाटप निरीक्षकांनी शांतीनगर येथील अधिकृत शिधावाटप दुकानांची अचानक भेट देऊन तपासणी केली असता, क्र. ३७ फ १८०, रास्तभाव दुकानामध्ये गंभीर स्वरुपाचे दोष आढळून आल्याने या दुकानदारांच्या विरुध्द शांती नगर पोलीस ठाणे येथे दि.१ फेब्रुवारी २०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर दुकानाचे प्राधिकारपत्र न्यायालयाचे निर्णयाचा अधीन राहून निलंबित करण्यात आले आहे.

तसेच शांतीनगर परिसरातील कार्यरत असलेल्या रास्तभाव दुकानदाराच्या तपासण्या करण्यात आल्या असून, तपासण्याच्या अनुषंगाने गृहभेटी देण्याचे काम सुरु आहे.

गृहभेटीच्या वेळी अपूर्ण पत्ता असल्याच्या १५३ शिधापत्रिका निलंबित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर, पुणे महामार्गावरील उजनी मुख्य कालव्याच्या पुलावरुन ट्रॅक्टर कालव्यात पडल्याबाबत**

**(२१) १४८९१ (०७-०४-२०१५). श्री. अजित पवार (बारामती), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर, पुणे महामार्गावरील उजनी मुख्य कालव्याच्या पुलावरुन दि. १८ फेब्रुवारी २०१५ रोजी ट्रॅक्टर कालव्यात पडल्याने ट्रॅक्टरमधील सात ऊसतोड मजूर बेपत्ता झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :**(१) दि.१८.२.२०१५ रोजी पुणे-सोलापूर महामार्गावर उजनी धरणाच्या मुख्य कालव्याच्या पुलावरुन ट्रॅक्टर डंपिंग ट्रॉलीसह कालव्यात पडून झालेल्या अपघातातमध्ये ४ ऊसतोड मजूर (१ पुरुष, ३ स्त्रिया) व त्यांची ३ लहान मुले बुडून मरण पावली आहेत.

(२) व (३) दि.१८.२.२०१५ रोजी पहाटेच्या दरम्यान ६ ऊसतोड मजूर (३ पुरुष व ३ स्त्रिया) व त्यांची तीन लहान मुले त्यांच्या गावाकडे ट्रॅक्टरला जोडलेलया डंपिंग ट्रॉलीमधून निघाले होते. ही बाब टोळी मालकास समजल्यानंतर त्या दोन जणांनी बोलेरो जीपमधून त्यांचा पाठलाग करुन व दगडफेक करुन बळजबरीने टूंक्टर अडविण्याचा प्रयत्न केला. परिणामी घाईगडबडीत सदर ट्रॅक्अर डंपिंग ट्रॉलीसह उजनी धरणाच्या मुख्य कालव्याच्या पुलावरुन कालब्यात कोसळून अपघात घडला. या अपघातामध्ये दोन ऊसतोड मजूर पोहुन बाहेर निघाले ४ ऊसतोड मजूर (१ पुरुष, ३ स्त्रिया) व त्यांची ३ लहान मुले बुडून मरण पावली आहेत.

या प्रकरणी पोलीसांनी केलेल्या तपासात मयत ट्रॅक्टर चालक ऊस मजूर आणि बोलेरोतून पाठलाग करणारे दोघेजण दोषी आढळले असल्याने त्यांच्याविरुध्द टेंभूर्णी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २२/२०१५ भा.दं.वि.सं. ३०४, २७९, ३३७, ४२७ सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास सुरु आहे.

---

## मुंबईतील घाटकोपर येथे दोन पत्रकारांना नगरसेवकांनी मारहाण केल्याबाबत

**(२२) १४८९६ (०८-०४-२०१५). श्री. अजित पवार (बारामती), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर येथे संत मुक्ताबाई रुग्णालयातील कारभाराबाबत पाहणीसाठी गेलेल्या दोन पत्रकारांना एका नगरसेवकांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली असून या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी घाटकोपर पोलीस ठाणे येथे दिनांक ११.२.२०१५ रोजी गुन्हा नोंद क्र.४८/२०१५ भारतीय दंडविधान संहिता कलम ५०६(२), ५०४, ३४ अन्वये ३ आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लिपीक शिपायांची भरती कंत्राटपध्दतीने करण्याच्या निर्णयाबाबत

**(२३) १४९०४ (०८-०४-२०१५). श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील विविध कार्यालयात भरली जाणारी तृतीय व चतुर्थ श्रेणीची पदे बाह्य यंत्रणे मार्फत कंत्राटी पध्दीने भरण्याचा निर्णय दिनांक ४ जुलै, २०१४ रोजी घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचा आर्थिक भार कमी करण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय कार्यालय मेहनतीची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबतच असा निर्णय घेण्यात आला असल्याचे भविष्यात शासकीय सेवेतील लिपीक, शिपाई, चपराशी, मुकादम, भंडार-नोकर, पहारेकरी, सफाईकामगार, आचारी वाहन चालक इत्यादी पदावर अन्याय होणार असल्याने या वर्गामध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाची कोणती भूमिका आहे

(५) तसेच, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०५-२०१५)** :(१) होय अशा आशयाच्या सुचना दि २७-०९-२०१० च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत

(२) होय

(३) (४) व (५) मनुष्यबळाचे कायम दायित्व निर्माण न करता प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेउन विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या हष्टीने शकय असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सहजरीत्या जी कामे बाहययंत्रणेडून करुन घेता येतील अशी कामे बाययंत्रणेकडून करुन घेण्याच्या सूचना प्रशासकीय विभगांना देण्यात आल्या आहेत तथापि प्रकरणपरत्वे आवश्यकतेनुसार नियमित पध्दतीने कर्मचारी घेण्याचे तुलनेत बाहययंत्रणेकडून कामे करुन घेण्याचे प्रमाण अल्प आहे

---

**राज्यातील सरकारी सेवा व शिक्षणात मागासवर्गीयांना आरक्षण देण्याबाबत**

**(२४) १४९१९ (०९-०४-२०१५). श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संविधानातील कलम १६ (४) नुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या समाजाला सरकारी सेवेत आणि शिक्षणात आरक्षण देण्यासाठी कायदा करण्याचे अधिकार राज्य शासनाला देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सरकारी सेवा व शिक्षणात मागासवर्गीयांना आरक्षण देणारा सरकारचा कायदा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ ला रद्द ठरविला आहे,

(३) असल्यास, मागासवर्गीयांच्या राज्यातील आरक्षणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (MAT) दिनांक २८.११.२०१४ रोजी महाराष्ट्र आरक्षण कायदा २००१ हा कायदा घटनाबाहय असल्याचा निर्णय दिला आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरणाने दिलेल्या दिनांक २८.११.२०१४ रोजीच्या निर्णया विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी अपिल दाखल करण्यात आले असून, सदर अपिलास रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ७२५६/२०१५ असा दिला होता. सदर प्रकरणी दिनांक २०.३.२०१५ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणीच्या वेळी सदर याचिकेस रिट याचिका क्र. २७९७/२०१५ असा दिलेला आहे. त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या दिनांक २८.११.२०१४ च्या आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठी चित्रपट-नाटकांना मिळणा-या अनुदानाच्या धरतीवर संपूर्ण मराठी कर्मचारी, खाद्यपदार्थ असलेल्या हॉटेलांना करामध्ये सवलत मिळण्याबाबत**

**(२५) १४९६४ (०८-०४-२०१५). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी चित्रपट-नाटकांना मिळणा-या अनुदानाच्या धरतीवर संपूर्ण मराठी कर्मचारी, खाद्यपदार्थ असलेल्या हॉटेलांना करामध्ये सवलत मिळावी अशी एकमुखी मागणी मुंबईतील मराठी हॉटेल व्यावसायिकांनी शासनाकडे केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने मुंबईतील मराठी हॉटेल व्यावसायिकांना कर सवलतीबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या कार्यवाहीचा तपशील काय,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०५-२०१५) :** (१) सदर प्रश्नाबाबतच्या संबंधीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

---

**राज्यातील मागासवर्गीय समाजाविरूध्द मॅटने दिलेल्या निर्णयामुळे उच्च न्यायालयास सादर करण्याबाबत**

**(२६) १४९७२ (१०-०४-२०१५). प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. डी.एस.अहिरे (साक्री), डॉ. अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, जमाती, भटके-विमुक्त, विशेष मागास प्रवर्ग, ओबीसी यांच्यासाठी ५२ टक्के आरक्षणाची तरतूद करणारा कायदा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण (मॅट) यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ रोजी रद्द केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मॅटच्या या निर्णयाविरुध्द राज्य शासनाने मा.उच्च न्यायालयात अपिल दाखल केलेली नाही, तसेच शासनाने अपिल न केल्यास राज्यातील सर्वच आरक्षण रद्द होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मागासवर्गीय समाजाविरूध्द मॅटने दिलेल्या निर्णयामुळे मा.लोकप्रतिनिधी यांनी सदरहू प्रकरण उच्च न्यायालयास सादर करण्याकरिता मा.मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरण उच्च न्यायालयास सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०५-२०१५) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) ही वस्तुस्थिती नाही. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या दिनांक २८.११.२०१४ रोजीच्या निर्णया विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे शासनाने दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी अपिल दाखल करण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने त्यांच्या दिनांक २८.११.२०१४ रोजीच्या स्वत:च्या आदेशास पुढील १ वर्षाकरिता स्थगिती दिली असल्याने सद्य:स्थितीत आरक्षण कयदा-२००१ तसेच शासन निर्णय दिनांक २५.५.२००४ ची अंमलबजावणी पुर्वीप्रमाणे सुरु होती.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे शासनाने दिनांक १३ मार्च, २०१४५ रोजी अपील दाखल केले. सदर अपिलास रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ७२५६/२०१५ असा दिला होता. सदर प्रकरणी दिनांक २०.३.२०१५ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणीच्या वेळी सदर याचिकेस रिट याचिका क्र. २७९७/२०१५ आसा दिलेला आहे. त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या दिनांक २८.११.२०१४ च्या आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणी काळभोर (जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परिक्षेचे पेपर तपासण्यासाठी खाजगी कंत्राटदारांना देण्यात आल्याबाबत**

**(२७) १४९८८ (०९-०४-२०१५). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणी काळभोर (जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रज्ञा शोध परिक्षेचे पेपर तपासण्यासाठी खाजगी कंत्राटदारांना देण्यात आले मात्र त्यांनी आठ महिन्यानंतरही पेपर तपासून दिले नसल्यामुळे निकाल जाहिर करण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषी आढळून येणा-या कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच उक्त परिक्षेचा निकाल त्वरीत लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय. संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली असून त्या ठेकेदारचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच संबंधित ठेकेदाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे व प्रज्ञाशोध परिक्षेचा निकाल तयार करण्यात आलेला असून प्रसिध्द करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध न्यायालयांमध्ये पायाभूत सुविधांच्या अभाव असल्याबाबत**

**(२८) १४९९४ (०७-०४-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध न्यायालयांमध्ये पायाभूत सुविधांच्या अभावामुळे न्यायालयीन कर्मचारी, याचिकाकर्ते यांची गैरसोय होत असल्याने सुविधांना निधी उपलब्ध करुन देण्याचे आदेश देवूनही दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयातील पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) राज्यातील न्यायालयांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाच्या मागणीनुसार राज्यातील विविध न्यायालयांमध्ये न्यायिक अधिकारी/कर्मचारी, अधिवक्ता आणि पक्षकारांसाठी (महिला व पुरुषांसाठी स्वतंत्रपणे व अपंगासाठी) पुरेशी प्रसाधगृहे व बैठक व्यवस्थेकरीता शासन ज्ञापन क्र.याचिका-१२१४/प्र.क्र.२१४/कार्या-११, दि.२१ एप्रिल, २०१५ च्या अन्वये रु.१३,६४,३९,०००/- इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मराठवाडा,नागपूर,अमरावती,यवतमाळ व नाशिक विभागातील तालुक्यांमध्ये भूगर्भातील पाण्याच्या पातळीत घट झाली असल्याबाबत**

**(२९) १४९९८ (०७-०४-२०१५). श्री. डी.एस.अहिरे (साक्री), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाड्यात ६१, नागपूर-३०, अमरावती विभागातील १९, यवतमाळमध्ये १३ तर, नाशिक विभागातील २५ तालुक्यांमध्ये भूगर्भातील पाण्याच्या पातळीत घट झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याबाबत तसेच नागरिकांना होणा-या पाणी टंचाईचा त्रास दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०५-२०१५) :** (१) अशंतः खरे आहे. शासन निर्णय क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दि.०३.०२.१९९९ नुसार पर्जन्यमान व भूजल पातळीचा अभ्यास प्रत्येक वर्षी माहे ऑक्टोबर, जानेवारी, मार्च व मे महिन्यात करण्यात येतो. माहे जानेवारी, २०१५ मधील भूजल पातळीच्या अभ्यासावरुन असे आढळून येते की, औरंगाबाद विभागातील ७३ तालुक्यातील ४२६० गावे, नागपूर विभागातील २९ तालुक्यातील ८०२ गावे, अमरावती विभागातील १५ तालुक्यातील १४० गावे (यवतमाळ वगळता) व यवतमाळ जिल्ह्यातील ७ तालुक्यातील ११० गावे तसेच नाशिक विभागातील १८ तालुक्यामध्ये ७४६ गावामध्ये स्थिर भूजल पातळीत १ मी. पेक्षा जास्त घट आढळून येते.
(२) राज्यातील भूजल पातळीचा अभ्यास प्रतीवर्षी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत करण्यात येतो व आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची टंचाई परिस्थिती निवारणार्थ उपाययोजना जिल्हाधिकारी व मुख्या कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत घेण्यात येतात.
(३) अ) शासन निर्णय क्र.टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दि.०३.०२.१९९९ निर्णयानुसार ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई परिस्थिती निवारणार्थ विविध उपाययोजना जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत राबविण्यात येतात.
(ब) पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या वाडया/वस्त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचे उद्भव बळकटीकरणासाठी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने विकास कामासाठी ८०० कोटी रूपये कर्ज रोखे काढण्याच्या निर्णयबाबत**

**(३०) १५०१४ (०८-०५-२०१५). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने विकास कामासाठी ८०० कोटी रूपये कर्ज रोखे काढण्याचा निर्णय दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी जाहीर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) तसेच, विक्रीस काढलेल्या कर्ज रोख्यांचा व्याजदर काय आहे व त्याचा किती भार राज्यांतर्गत जनतेला सहन करावा लागणार आहे?
(४) तसेच कर्ज रोखे काढण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्यातील विविध विकास कामांसाठी सदरचे कर्जरोखे घेण्यात आले असून हे कर्ज १० वर्षासाठी उभारले आहे. रिझर्व्ह बँकेमार्फत घेण्यात येणा-या लिलावामधुन सदरचे कर्ज रोखे उभारण्यात आले असून, या लिलावामध्ये बँका, वित्तीय संस्था सहभागी होतात. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. २५०८३.३० कोटी इतके खुल्या बाजारातुन कर्ज उभारणे प्रस्तावित होते. या वित्तीय मर्यादेतच सदर कर्ज उभारण्यात आले आहे. सदरहू कर्जाचा निधी राज्याच्या एकित्रत निधीमध्ये जमा होऊन त्याचा विनियोग चराज्यातील विविध विकास कामांसाठी झाला आहे. या रु.८०० कोटी कर्जाचा व्याजदर ८.०५% असून यानुषंगाने वार्षिक रु.६४.४० कोटी बोजा पडणार आहे.

---

**मुंबई विद्यापीठांतर्गत येणा-या जमनालाल बजाज इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा ८५ टक्के जातिनिहाय प्रवेश कोटा संपुष्टात आल्याबाबत**

**(३१) १५०३५ (०९-०४-२०१५). श्री. संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातंर्गत येणा-या जमनालाल बजाज इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई हे कॉलेज सन २०१५ पासून अॅटॉनॉमस झाल्याने या कॉलेजमधील एम.एम.एस.शिक्षणातील मुंबई होम युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचा ८५ टक्के जातीनिहाय प्रवेश कोटा संपुष्टात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे होम युनिव्हर्सिटीच्या उपलब्ध सीटस कमी झाल्याने विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून एम.बी.ए/एम.एम.एस च्या शिक्षणाच्या प्रवेश स्पर्धेतून बाहेर पडण्याची संबंधित विद्यार्थ्यांमध्ये भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन शासनस्तरावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१५) :**(१), (२) व (३) जमनालाल बाजाज इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड स्टडीज या संस्थेस मुंबई विद्यापीठाने स्वयतत्ता प्रदान केलेली असून सदर संस्थेने प्रवेश राष्ट्रीय स्तरावरील (CAT) आणि राज्याकडून घेतल्या जाणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेकच्या (CET) गुणांवर आधारित करण्यात येणार असल्यामुळे राज्यातील गुणवत्ताधारक उमेदवारांना या संस्थेत प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कापूस बियाण्याची गुणवत्ता टिकवून ठेवण्याबाबत

**(३२) १५०४१ (०८-०४-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही पिकांपासून भरघोस उत्पन्न मिळविण्यासाठी अधिक उत्पादन देणा-या संकरित, सुधारित जातींची लागवड तसेच पेरणीसाठी वापरायाचे बियाणे शुध्द दर्जेदार असावे या मुलभूत बाबींचा विचार करुन राज्य शासनाच्या कृषि विभागाने बीज परिक्षण प्रयोगशाळेत गेल्या पाच वर्षात १ लाख ८१ कापूस बियाण्याची गुणवत्ता तपासणी करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये १९ हजार ७३६ बियाणे अप्रमाणित ठरविण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसेंदिवस कापूस बियाण्याची गुणवत्ता घसरत असल्यामुळे गेल्या पाच वर्षात विदर्भात कापसाच्या उत्पन्नात मोठी घट झाल्याचे एका पाहणीत आढळून आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कापूस बियाण्याची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहे वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५) :**(१) व (२) गेल्या पाच वर्षात बीज परिक्षण प्रयोगशाळेत १०,९७१ इतक्या संकरीत व सुधारीत कापूस बियाण्याचे नमुने तपासण्यात आलेले आहेत, त्यापैकी ११२७ कापूस बियाण्याचे नमुने अप्रमाणित ठरविण्यात आलेले आहेत.

(३) अशी कोणतीही पाहणी करण्यात आलेली नाही.

(४) राज्यात कापूस बियाण्यासाठी महाराष्ट्र कापूस बि-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ हा स्वतंत्र कायदा अस्तित्वात असून सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी एकूण १११९ गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून ३९३ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. कापूस बियाणे संदर्भात तक्रारी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. शेतक-यांकडून प्राप्त होणा-या तक्रारीवर वेळीच कार्यवाही होण्यासाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करणे, बनावट/बोगस किंवा अप्रमाणीत बियाणे संदर्भात विक्रीबंद आदेश, जप्ती करणे व पोलीस केसेस करणे, उत्पादक, वितरक व विक्रेते यांचे स्तरावर बियाण्याचे नमुने काढणे, विश्लेषन अहवालानुसार नमुने अप्रमाणीत असल्यास परवान्याबाबत प्रशासकीय कार्यवाही करणे, इ.उपाययोजना करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हा परिषदेच्या विविध विभागात अधिकारी व कर्मचा-यांनी केलेल्या आर्थिक अनियमिततेबाबत

**(३३) १५०४६ (०८-०४-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेच्या विविध विभागात अधिकारी व कर्मचा-यांनी केलेल्या आर्थिक अनियमिततेमध्ये तब्बल ५ कोटी ९९ लाख २५ हजार एवढी रक्कम असल्याचे नुकतेच उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली आहे,

(३) या प्रकरणी अद्यापही चौकशी पूर्ण झाली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय. प्रकरणनिहाय चौकशी करण्यात आलेली आहे. त्यानुसार वसूली सुरु असून कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून काही प्रकरणे न्यायप्रविष्ट असून काही प्रकरणांची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही.

(३) जिल्हा परिषदेकडील प्रकरणांची चौकशी पूर्ण झालेली आहे. मात्र ग्रामपंचायत विभागाकडील काही प्रकरणांची चौकशी अद्याप बाकी आहे. प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने चौकशी पूर्ण होण्यासाठी विलंब होत आहे.

---

## सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पैनगंगा सहकारी सुत गिरणी आणि जिजामाता सहकारी साखर कारखाना गेल्या वर्षभरापासून बंद असल्याबाबत

**(३४) १५०५७ (१०-०४-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पैनगंगा सहकारी सुत गिरणी आणि जिजामात सहकारी साखर कारखाना गेल्या वर्षभरापासून बंद आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच सूतगिरणी व साखर कारखाना बंद असल्यामुळे सुमारे १००० कामगारांवर उपासमारीची पाळी आली हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सूतगिरणी व साखर कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना आखली आहे वा आखण्यात येत आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०५-२०१५) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे काय,

पैनगंगा सहकार सुत गिरणी बंद पडली तेव्हा २५० कामगार कार्यरत होते. सुतगिरणी मालमत्ता दि बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थकीत कर्ज वसुली करीता जप्त करुन ताब्यात घेतली असल्याने कामगारांना सद्यस्थितीत काम मिळत नाही.

बंद पडलेल्या जिजामाता सहकारी साखर कारखान्यातील कामगारांवर उपासमारीची वेळ आली हे अंशत: खरे आहे. दरम्यान जिल्हा धिकारी तथा अवसायक यांनी कर्मचाऱ्यांची देय असलेली उपदानाची रक्कम कर्मचाऱ्यांना अदा केली आहे.

(३) पैनगंगा सहकारी सुत गिरणीची मालमत्ता दि बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकार न्यायालयाचे अवार्डनुसार थकीत कर्ज वसुलीसाठी दि ८.४.२००४ रोजी जप्त केली आहे. सध्या गिरणीची मालमत्ता बँकेच्या ताब्यात आहे. तसेच सदर सूतगिरणी तोटयात अाहे. सदर सूतगिरणी वस्त्रोद्योग संचालनालयाचे दि. ६.४.२०१५ च्या अंतरीम आदेशान्वये अवसायनात घेण्यात आली आहे. तर जिजामाता सहकारी साखर कारखाना अवसायनात घेण्यात आला आहे. तसेच कारखान्याकडील थकीत कर्ज वसुलीसाठी कारखान्याची संपूर्ण चल व अचल मालमत्ता जिल्हा धिकारी बुलढाणा यांच्या दि. १८/५/२०१३ च्या आदेशान्वये सरफेसी ॲक्ट अंतर्गत दि. ५/६/२०१३ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यामुळे ह्या दोन्ही संस्था पुन्हा सुरु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगाव राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) मही उपबाजार समितीच्या गोडाऊन मधून धान्य चोरणा-या ४ चोरांना पोलिसांनी पकडल्याबाबत**

**(३५) १५०५८ (०७-०४-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) मही उपबाजार समितीच्या गोडाऊन मधून दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी रात्रौ धान्य चोरणा-या ४ चोरांना पोलिसांनी पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोरलेल्या धान्याची किंमत किती आहे,

(३) असल्यास, पकडलेल्या चोरांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय.

(२) चोरलेल्या धान्याची किंमत रु. २४,०००/- आहे.

(३) सदर प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस स्टेशन येथे दिनांक ०७ जानेवारी, २०१५ रोजी गु.र.क्र.०३/१५, भा.दं.वि. कलम ४६१, ३८० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. दोषारोपपत्र तयार करण्यात आले असून न्यायालयात सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील चार गिरण्यांचे अमरावती व बार्शीमध्ये स्थलांतर करण्याचा घेतलेला निर्णय

**(३६) १५११५ (१०-०४-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील चार गिरण्या अमरावती व बार्शी येथे स्थलांतर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थलांतरीत गिरण्या कोणत्या आहेत तसेच हे स्थलांतर किती काळात होणार आहे,

(३) तसेच स्थलांतर करण्यासाठी गिरणी मालकांना शासनाने कोणकोणत्या सेवा -सवलती देण्यात येणार आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१५) :**(१) नाही. राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडलाच्या मुंबईतील बंद गिरण्या व बंद हण्याच्या मार्गावर असलेल्या गिरण्या राज्यातील कापूस उत्पादक क्षेत्रात स्थालांतरीत करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या मान्यतेने घेतल्यास येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी समन्वय करण्यासाठी शासन निर्णय दि. ०९.०२.२०१५ अन्वये अ.मु.स. (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात बेलोरा येथे विकसीत करावयाच्या विमानतळाबाबत

**(३७) १५१२० (०७-०४-२०१५). डॉ. सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात बेलोरा येथे विमानतळ विकसीत करण्याचा शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयान्वये विमानतळासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या भुसंपादनाची कार्यवाही तसेच विमानतळ विस्तारीकरणाचे प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) बेलोरा, जि. अमरावती येथील विमानतळाच्या विकासाच्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तथापि, भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने दिनांक १३/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये बेलोरा, जि. अमरावती येथील विमानतळ सद्य:स्थितीत आर्थिकदृष्टया फायदेशीर नसल्याचे कळविले आहे. त्यानुषंगाने शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मालवण (जि.सिधुदूर्ग) तालुक्यातील १३७ कलाकारांना मानधन मिळण्याबाबत**

**(३८) १५१४२ (०७-०४-२०१५). श्री. नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिधुदूर्ग) तालुक्यातील १३७ कलाकरांना गत सहा महिन्यापासून मानधन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कलाकरांना त्वरेने मानधन वितरीत करण्यांसंदर्भातील निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

विभागाच्या दि २८ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये माहे नोव्हेंबर, २०१४ ते फेब्रुवारी, २०१५ या ४ महिन्याचे तसेच दि.८ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मार्च १५ ते जून १५ या ४ महिन्याच्या मानधनाच्या निधीचे वाटप करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३९) १५१४६ (०९-०४-२०१५). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी या वर्षापासून सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी होण्याकरीता आवश्यक अंमलबजावणी समिती व विभागीय शुल्क नियंत्रण समिती आजवट स्थापन झाली नसल्याचे माहे फेब्रवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत **?**

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

दिनांक २१ मार्च,२०१४ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रा अन्वये महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आला अाहे व त्याची अंमलबजावणी १ डिसेंबर, २०१४ पासून करण्यात आली आहे. सदर कायद्याची अंमलबजावणी होण्याकरिता अंमलबजावणी समिती व विभागीय शुल्क नियंत्रण समिती स्थापन करण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धरणांमध्ये पाणीसाठ्याची माहिती नागरिकांना कळण्याकरिता सुरु करण्यात आलेली शासनाची वेबसाईटवरील माहिती गेली कित्येक महिन्यांपासून अपडेट होत नसल्याबाबत**

**(४०) १५१५६ (०८-०५-२०१५). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांमध्ये पाणीसाठ्याची माहिती नागरिकांना कळण्याकरिता सुरु करण्यात आलेली शासनाची वेबसाईटवरील माहिती गेली कित्येक महिन्यांपासून अपडेट होत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही माहिती दैनंदिन अपडेट करण्याची जबाबदारी कोणाची आहे,

(३) उक्त प्रकरणी शासनाने दोषींवर कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) सदर माहिती दि. ०१ जून, २०१३ पासून ई प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयामार्फत www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्यावत केली जात आहे. त्यापूर्वी ही माहिती मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचे कार्यालयामार्फत www.mahawrd.org या संकेतस्थळावर अद्यावत केली जात होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगडावरील शिवकालीन बांधकामाची झालेली पडझड**

**(४१) १५१६४ (०७-०४-२०१५). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगडावरील शिवकालीन बांधकामाची पडझड झाली असून पुरातत्व विभागाच्या दिरंगाईमुळे त्या ठिकाणी दुरुस्ती करता येत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुनही यावर कोणताच पर्याय उपलब्ध झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी शिवसृष्टीच्या पूर्ववत उभारणीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार रायगड किल्ल्याच्या जतन दुरुस्तीचे काम हे मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रकानुसार व प्राप्त झालेल्या निधीतून केले जाते.

(३) महानिदेशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण दिल्लीने, RCP द्वारे मंजूर केलेली जतन दुरुस्तीची कामे रायगड येथे केली जात आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चौके-आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या इ.जि.मार्गाची मोठ्या प्रमाणावर झालेली दुरवस्था**

**(४२) १५१८७ (०८-०४-२०१५). श्री. सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौके-आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या इ.जि.मार्गाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असूनही निधी अभावी सदरहू मार्गाच्या दुरुस्तीचे काम गेली अनेक वर्षे प्रलंबित असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुस-या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मार्गाच्या डांबरीकरण व नुतनीकरणाचे काम तातडीने घेण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) चौके-आंबेरी रस्त्याचे ना वच्हाटा आंबेरी मार्ग असे असून सदर रस्ता रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र.४०७ आहे, सदर रस्त्याची अस्तित्वातील एकूण लांबी ६.६०० कि.मी. आहे. त्यापैकी ६.५०० कि.मी. पृष्ठभाग डांबरी असून ०.१०० कि.मी. पृष्ठभागा सुस्थितीत आहे. १.०७९ कि.मी. लांबीची दुरुस्ती करण्यात आली आहे. सदर रस्त्यावर बारमाही एस.टी. बस वाहतूक विना खंड सुरु आहे.

प्रश्नाधीन रस्त्याच्या उर्वरित पृष्ठभागातील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी व निकषाच्या अधिनतेने हाती घेण्याचे जिलहा परिषदेचे नियोजन आहे.

---

**अंभोरा शिवार, देऊळगाव राजा जि.बुलढाणा येथे १३२ केव्ही सबस्टेशनबाबत**

**(४३) १५२१७ (३०-०४-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऑगस्ट, २००९ मध्ये अंभोरा शिवार, देऊळगाव राजा जि.बुलढाणा येथे १३२ केव्ही सबस्टेशन मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सबस्टेशनमधील १०० उंच मनो-यापैकी केवळ ९ उंच मनो-याचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सबस्टेशनचे बांधकाम पूर्ण करुन ते कार्यान्वित करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०४-२०१५) :**(१) होय,

(२) अंशतः खरे आहे.

या वाहिनीच्या ९८ मनो-यापैकी ४१ मनो-यांच्या पायाभरणीचे व ९ मनो-यांच्या उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.

(३) उपकेंद्र व वाहिनी उभारण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन डिसेंबर, २०१५ पर्यन्त कार्यान्वीत करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत.

---

### सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) राजवाड्यातील तोफ चोरट्यांनी पळविल्याबाबत

**(४४) १५२१८ (०७-०४-२०१५). डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) राजवाड्यातून ८५ किलो वजनाची करोडो रुपये किंमतीची तोफ चोरट्यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान पळविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सिंदखेडराजा पोलीस स्थानकांत तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) होय.

सदर प्रकरणी, सिंदखेडराजा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.८५/२०१४, भा.दं.वि. कलम ३८०, ३४, १०९, १२० ब अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर प्रकरणी तपासाअंती ७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ८५ किलोची तोफ हस्तगत करण्यात आली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सांगली जिल्ह्यामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त असल्याबाबत.

**(४५) १५२४८ (०७-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांस ३-३ दवाखान्याचा अतिरिक्त प्रभार देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एका पशुवैद्यकीय अधिकाऱ्याला अतिरिक्त भार दिल्याने जनावरांचे उपचाराविना हाल होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या रिक्त जागा भरणेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
एका पशुवैद्यकीय अधिका-याकडे एकाच दवाखान्याचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकरी गट-अ संवर्गाची रिक्त असलेली एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले हेते. त्यानुसार आयोगाने दि.१२.३.२०१५ रोजी ३०० पात्र उमेदवारांची यादी जाहीर केलेली आहे. सदर उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी करुन त्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील बाणूरगड प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत**

**(४६) १५२५२ (०७-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील बाणूरगड प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना अनेक दिवसापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे काही ठिकाणी पाईप खराब झाल्यामुळे पाण्याची गळती मोठ्या प्रमाणावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०४-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे. योजनेतील समाविष्ठ असलेल्या चौदा गावांची पाणी पुरवठ्याची मागणी नसल्याने योजना बंद ठेवण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. मागणी अभावी योजना बंद ठेवण्यात आली असून दि.५ एप्रिल,२०१३ ते २० सप्टेंबर, २०१३ या टंचाई कालावधीत योजनेतून पाणी पूरवठा करण्यात आला होता.
(३) व (४) योजनेत समाविष्ट असलेल्या गावांची पाणी पुरवठयाची मागणी आल्यास योजनेतून पाणी पूरवठा करण्यात येईल.

---

**जाधववाडी (ता.खानापूर ,जि. सांगली ) येथील प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत**

**(४७) १५२५३ (०७-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाधववाडी (ता.खानापूर, जि.सांगली) येथील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना अनेक दिवसापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काही ठिकाणी पाईप खराब झाल्यामुळे पाण्याची गळती मोठ्या प्रमाणावर होत आहे, हे ही खरे अाहे काय,

(३) असल्यास, सदर योजना सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०४-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे. योजनेतील समाविष्ट असलेल्या आठ गावांची पाणी पुरवठ्याची मागणी नसल्याने योजना बंद ठेवण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. मागणी अभावी योजना बंद ठेवण्यात आली असून दिनांक १ एप्रिल, २०१३ ते दि. २० सप्टेंबर, २०१३ या टंचाई कालावधीत योजनेतून पाणी पुरवठा करण्यात आला होता.

(३) व (४) योजनेत समाविष्ट असलेल्या गावांची पाणी पुरवठयाची मागणी आल्यास योजनेतून पाणी पुरवठा करण्यात येईल.

---

**मायणी (जि.सातारा) येथील राष्ट्रीय स्पर्धेत मृत झालेल्या मयुरेश पवार याच्या नावाने क्रीडा पुरस्कार सुरु करण्याबाबतची केलेली मागणी**

**(४८) १५२५७ (०९-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मायणी (जि.सातारा) येथील मयुरेश पवार यांचा राष्ट्रीय स्पर्धेवेळी हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मयुरेश पवार हा राष्ट्रीय खेळाडू असल्याने त्याच्या नावाने क्रीडा पुरस्कार सुरु करण्यात यावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-०४-२०१५) :**(१) केरळ येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेच्या वेळी मयुरेश भगवान पवार, सातारा या खेळाडूचा बुडून अपघाती मृत्यू झाला आहे हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) सातारा जिल्हास्तरावर देण्यात येणाऱ्या गुणवंत खेळाडू पुरस्काराचे नाव "कै.मयुरेश पवार गुणवंत्त खेळाडू पुरस्कार" असे करण्याबाबतची मागणी तपासण्यात येत आहे.

---

**सांगली जिल्ह्यामध्ये गेल्या सहा महिन्यांपासून पोषण आहार योजनेचे अनुदान दिले नसल्याबाबत**

**(४९) १५२६१ (०९-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यामध्ये गेल्या सहा महिन्यांपासून पोषण आहार योजनेचे अनुदान दिले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पोषण आहार योजनेचे अनुदान देण्याविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेदाणा निर्मितीला लघु उद्योगाचा दर्जा मिळणेबाबत**

**(५०) १५२७० (१०-०४-२०१५). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेदाणा निर्मितीला लघु उद्योगाचा दर्जा मिळावा, जेणेकरून शासकीय सवलतीचा लाभ मिळेल, तसेच या व्यवसायातून हजारो स्त्री-पुरूषांना रोजगार मिळेल असे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०५-२०१५) :**(१) व (२) “Activity & Products classification for MSME sector” अनुसार बेदाणा निर्मितीला लघु उद्योगाचा दर्जा प्राप्त आहे.

केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अधिनियम, २००६ अंतर्गत ज्ञापन भाग-१ व भाग-२ चे स्विकृतीपत्र असलेल्या घटकांना शासनाच्या सामुहिक प्रोत्साहन योजना - २०१३ अंतर्गत विहित असलेल्या निकष व अटींनुसार पात्र उद्योग घटकांना विहित प्रोत्साहने देय होतात. त्यानुसार बेदाणा निर्मिती करणा-या पात्र लघु उद्योगांना विविध शासकीय सवलती / प्रोत्साहने देय आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.